महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २१ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३२२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पत्रकार हवे आहेत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा



दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)

संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com


# कल्याण पूर्वेत इमारतीचा स्लॅब कोसळला

## ६ जणांचा मृत्यू - ६ जखमी ■ युद्ध पातळीवर बचावकार्य सुरू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आज मंगळवार दिनांक २० मे रोजी कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील जे प्रभागात सप्तशृंगी को-ऑप. हाऊसिंग सोसायटी' या इमारतीचा स्लॅब अचानक कोसळला. आज दुपारी अचानक स्लॅब कोसळल्याने मोठा आवाज झाला व परिसरात खळबळ उडाली.घटनेनंतर तात्काळ केडीएमसी आपत्कालीन पथक, फायर ब्रिगेड, सिव्हिल डिफेन्स आणि टीडीआरएफ टीम घटनास्थळी दाखल झाली. परिसरातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर सुरू असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. रात्री उशिरापर्यंत इमारतीचा मलबा उचलण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू आहे.

या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला असून मृतांमध्ये

१.प्रमिला साहू २. नमस्वी शेलार. ३. सुनीता साहू ४. सुजाता पाडी ५. सुशीला गुजर ६. व्यंकट चौहान यांचा समावेश आहे. तर जखमींमध्ये १.विनायक पाडी २. श्राविल शेलार ३. अरुणा गिरनारायण ४.यश क्षीरसागर ५. निखिल खरात ६. श्रद्धा साहू यांचा समावेश आहे.

महापालिका क्षेत्रात ५१३ इमारती धोकादायक अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या आहेत. महापालिका परिक्षेत्रात ३० पेक्षा जास्त जुन्या, इमारतीतील इमारत धारकांनी तसेच धोकादायक सदृश्य इमारतधारकांनी आपले स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे. या वेळी स्थानिक आमदार सुलभा गायकवाड, महापालिका आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायक्त संजय जाधव, अवधूत तावडे, प्रसाद बोरकर, परिमंडळ 3 चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, तहसीलदार सचिन शेजाळ, माजी नगरसेवक व महापालिकेचे इतर अधिकारी/ कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.






## कल्याण तालुका ग्रामीण भाजपा मंडळ अध्यक्षपदी शेखर लोणे यांची नियुक्ती



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नडगाव ग्रामपचायत उवसरपंच, तसेच तरुण तडफदार वेक्तिमत्व असणारे शेखर लोणे यांची कल्याण तालुका भाजपा अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. नुकताच त्यांना नियुक्ती पत्र देण्याचा सोहळा खडवली येथे सपन्न झाला, यावेळी आमदार किसन कथोरे, भाजपा जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाकी, अरुण पाटील उपाध्यक्ष जिल्हा बँक, रवींद्र घोडविंदे मुबंई विद्यापीठ सिनेट सदस्य, राजाभाऊ चौधरी, प्रकाश भोईर, गुड्डु धुमाळ, चिंतामन मगर, मंगेश शेलार, जगन्नाथ शेळके, पद्माकर हरड मुरली चौधरी यांच्यासह कार्क्रते उपस्थित होते. राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष, शेवटी स्वतः...!गावातील तरुणांना एकत्र घेऊन सामाजिक कार्याची सुरुवात केल्यानंतर ए१ ग्रुप, नडगांव च्या माध्यमातून विविध उपक्रम, योजना, संकल्पना राबविण्याचा प्रयत्न केला. यानंतर निसर्ग संवर्धन समिती, शंभुदुर्ग संघटना महाराष्ट्र राज्य, पर्यावरण उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य अशा विविध संघटनाशी सामाजिक काम करण्याच्या हेतूने जोडलो गेलो.मात्र राजकारण हा लोकशाहीचा महत्वाचा घटक आहे हे अनुसरून सुशिक्षित युवकांनी राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलावा व या माध्यमातून सामाजिक कार्यास अजून वेग यावा या हेतूने पहिल्या ग्रामपंचायत निवडणुकीत विजय संपादित करून मा. आमदार श्री. किसनजी कथोरे साहेबांशी जोडला गेलो. माझे आदर्श मार्गदर्शक तसेच मुरबाड मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार मा. श्री. किसनजी कथोरे साहेब व भाजपा ठाणे ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. जितेंद्रजी डाकी साहेब ह्यांच्या हस्ते मला भाजपा कल्याण ग्रामीणचे अध्यक्ष पदावर नियुक्त करण्यात आले. हा सन्मान फक्त माझा नव्हे तर नेहमी मला सहकार्य करणारे, माझ्या प्रत्येक निर्णयात माझ्या पाठीशी उभे राहणारे माझे कुटुंब, माझे मित्र परिवार यांचा आहे.पक्षाने व साहेबांनी दिलेली जबाबदारी सार्थ ठरविण्यासाठी आपणा सर्वांची साथ महत्वपुर्ण असेल. हि सोपवलेली महत्वाची जबाबदारी आहे, याची मला जाणीव आहे. निच्छितच आपण दिलेली जबाबदारीचा योग्य मान राखत आगामी काळात पक्ष वाढीसाठी व देशसेवेसाठी काम करेन असा विश्वास देतोय.

### खासदार सुरेश म्हात्रेकडून

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या नव्या प्रस्तावित जागेची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिमेच्या स्टेशन परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची काही जागा विकास प्रकल्पासाठी पालिका प्रशासनाने संपादित केल्याने उद्यानाच्या पाठीमागची जागा पालिका प्रशासनाने द्यावी अशी मागणी जोर धरू लागली आहे. या मागणीला केडीएमसी प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याची माहिती देत या ठिकाणी आदर्श वास्तूंची निर्मिती करण्यात येईल असा विश्वास भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी आंबेडकर उद्यानाच्या पाहणी दौऱ्या दरम्यान सोमवारी व्यक्त केला.



कल्याण रेल्वे स्टेशन नजिकच्या परिसरात यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची प्रशस्त जागा होती. मात्र विविध विकासकामांसाठी ही जागा संपादित करण्यात आल्याने सध्याच्या उद्याना पाठीमागे असणारी केडीएमसी प्रशासनाची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीला केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत तांत्रिक मुद्द्यांवर काम केल्यानंतर ही जागा देण्यात येईल असे आश्वासन दिल्याचे ही खासदार म्हात्रे यांनी सांगितले.

तर या नव्या प्रशस्त जागेवर बाबासाहेबांचा पुतळा, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, ज्येष्ठ नागरिकांसाठी कट्टा असे लहानांपासून प्रौढांपर्यंतच्या व्यक्तींसाठी उपयुक्त आणि आदर्श वास्तूची निर्मिती होऊ शकते असेही खासदार म्हात्रे यांनी स्पष्ट केले.यावेळी दलित मित्र आणि रिपाईचे ज्येष्ठ कार्यकर्ते अण्णा रोकडे, भीमराव डोळस, कुमार कांबळे, बाळू कांबळे, भूषण तायडे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील अनेक नेतेमंडळी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सन २०३० पर्यंत

## पस्तीस लाख घरांचे उद्दिष्ट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याच्या गृहनिर्माण धोरण 2025 ला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. 'माझे घर, माझा अधिकार' हे ब्रीद अनुसरून वर्ष 2030 पर्यंत राज्यातील प्रत्येक नागरिकाला शाश्वत, सुरक्षित आणि पर्यावरणास अनुकूल घराचे अभिवचन देणाऱ्या राज्याच्या गृहनिर्माण धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणात डाटा आधारित निर्णय प्रक्रिया, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, गतिमानता व पारदर्शकता आणि सामाजिक समावेशकता यावर भर दिला आहे.

**गृहनिर्माण धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

दोन दशकांनंतरचे धोरणः राज्याचे यापूर्वीचे गृहनिर्माण धोरण सन 2007 मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर सुमारे 18 वर्षांनी गृहनिर्माण धोरण जाहीर झाले आहे.

गृहनिर्माण धोरणाची चार मूलतत्वेः आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि आपत्तीशी संबंधित आव्हानांची पूर्तता करण्यासाठी घरे. परवडणारी, सर्वसमावेशक, शाश्वत आणि पुनर्माणशील अशा चार मार्गदर्शक तत्त्वांभोवती या धोरणाची रचना करण्यात आली आहे.

सामाजिक समावेशनः या धोरणात ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगारांसाठी विशेष उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. यामध्ये नोकरदार महिला, विद्यार्थी यांना भाडेतत्त्वावर आणि औद्योगिक कामगारांसाठी 10 वर्षांपर्यंत भाडेतत्त्वावर त्यानंतर मालकी हक्काने घरे दिली जातील. सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे विकासक आणि प्रचालकासाठी प्रोत्साहन दिले जाईल. सामाजिक गृहनिर्माणाकरिता सी.एस.आर. निधीचा वापर केला जाईल. याकरिता प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

**राज्यात 2030 पर्यंत 35 लाख घरांचे उद्दिष्टः**

राज्याने सन 2030 पर्यंत आर्थिकदृष्या दुर्बल घटकांसाठी सामाजिक गृहनिर्माण (एमआयजी) आणि अल्प उत्पन्न गट (एलआयजी) करिता 35 लाख घरे बांधण्याचे उद्दिष्टे ठेवली आहेत. याकरिता 70 हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. तसेच त्यापुढील 10 वर्षात 50 लाख घरांच्या निर्मितीचे उद्दिष्ट आहे.

**घरांची गरज व मागणी सर्वेक्षण विश्लेषणः**

सन 2026 पर्यंत सर्व जिल्ह्यांमध्ये निवासी सदनिकांची आवश्यकता आणि मागणीचे सर्वेक्षण व विश्लेषण करून यापुढे योजनांची आखणी / अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (स्टेट हाऊसिंग इन्फार्मेशन पोर्टल): डाटा आधारित निर्णय प्रक्रियेकरिता राज्य गृहनिर्माण माहिती पोर्टल (SHIP) केंद्रीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येणार. या पोर्टलवर घरांची मागणी आणि पुरवठासंदर्भात विदा मागोवा, सदानिकांचे जिओ-टॅगिंग, निधी वितरण, जिल्हानिहाय भूमी अधिकोष आणि महारेरा, महाभूलेख आणि पी.एम.गती शक्तीसारख्या प्रणालीशी एकरूपता तसेच पारदर्शकता आणि समन्वयाकरिता विश्लेषण, पूर्वानुमान आणि अद्ययावतीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता साधने वापरुन निर्णय घेण्यास मदत करेल.

### जलसिंचन, नगरविकास, खनिकर्म विभागांसदर्भात

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाची बैठक नुकतीच पार पडली असून जलसिंचन, नगरविकास, खनिकर्म अशा विविध विभागांसदर्भात महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



1) राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद. 70 हजार कोटींची गुंतवणूक येणार, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम. अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्यासाठी विशिष्ट गरजांचा धोरणात प्राधान्याने विचार

2) बायोमिथेनेशन तंत्रज्ञानाचा वापर करुन कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी मे. महानगर गॅस लिमिटेड यांना बृहन्मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने उपलब्ध करुन देणार (नगरविकास विभाग)

3) उद्योग विभागाच्या अंतर्गत धोरण कालावधी संपुष्टात आलेल्या धोरणांतर्गत विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी

4) कारंजा, जिल्हा वाशिम येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय. यासाठी एकूण 28 पदनिर्मितीला तसेच 1.76 कोटींच्या खर्चाला मंजुरी

5) सुलवाडे जामफळ कनोली उपसा सिंचन योजना, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे या प्रकल्पाच्या 5329.46 कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. 52,720 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार

6) अरुणा मध्यम प्रकल्पांतर्गत मौजे हेत, तालुका वैभववाडी जिल्हा सिंधुदुर्ग या प्रकल्पासाठी 2025.64 कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता. 5310 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार

7) पोशिर प्रकल्प, तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला 6394.13 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता

8) शिलार तालुका कर्जत जिल्हा रायगड या प्रकल्पाला 4869.72 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता









## कमी दाबाच्या पट्ट्यामुळे अरबी समुद्र खवळण्याची शक्यता

### मच्छिमार बांधवांनी हवामानाच्या स्थितीकडे लक्ष ठेवावे -प्रशासनाचे संकेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. 20 :** महाराष्ट्र आणि गोवा जवळ असलेल्या अरबी समुद्रावर 21 मे रोजी एक कमी दाबाचा पट्टा तयार होण्याचा अंदाज आहे आणि 24 मे पर्यंत हा कमी दाबाचा पट्टा अजून तीव्र होऊन उत्तरेकडे सरकण्याची शक्यता सध्या नाकारता येत नाही. या दरम्यान हा कमी दाबाचा पट्टा राज्याच्या किनारपट्टीपासून एका सुरक्षित अंतरावर राहणार असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे राज्याला त्याचा थेट धोका नसणार आहे. मात्र त्याच्या प्रभावामुळे 21 ते 24 मे दरम्यान राज्याजवळील असलेला अरबी समुद्र काही प्रमाणात खवळलेला पाहिला मिळू शकतो, तर पश्चिम किनारपट्टीवर 22 ते 24 दरम्यान पावसासह वाऱ्याचा वेग काही प्रमाणात वाढू शकतो. 21 आणि 22 मे रोजी सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांच्या जवळ असलेला समुद्र काही प्रमाणात खवळलेला पाहिला मिळू शकतो, तर खोल समुद्र जोरदार वाऱ्यामुळे अधिक प्रमाणात खवळलेला राहील. 22 ते 24 दरम्यान रत्नागिरी, मुंबई, आणि पालघर जवळ असलेला समुद्र काही प्रमाणात खवळलेला पाहिला मिळू शकतो, तर खोल समुद्र जोरदार वाऱ्यामुळे अधिक प्रमाणात खवळलेला राहील.

मासेमारांनी हवामानाच्या स्थितीकडे लक्ष ठेवावे, आणि स्वतःच्या सुरक्षितेसाठी 21 ते 24 मे दरम्यान अरबी समुद्रातील खोल भागांमध्ये जाणे टाळावे, असे आवाहन आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे.




# गीतासार



## अध्याय ११
## विश्वरूपदर्शनयोगः

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसङ्घैः । भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ ११-२६ ॥
वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति दंष्ट्राकरालानि भयानकानि । केचिद्विलग्ना दशनान्तरेषु संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः ॥ ११-२७ ॥

ते सर्व धृतराष्ट्राचे पुत्र राजसमुदायासह आपल्यात प्रवेश करीत आहेत आणि पितामह भीष्म, द्रोणाचार्य तसेच तो कर्ण आणि आमच्या बाजूच्याही प्रमुख योद्ध्यांसह सगळेच आपल्या दाढांमुळे भयंकर दिसणाऱ्या तोंडात मोठ्या वेगाने धावत धावत जात आहेत आणि कित्येक डोकी चिरडलेले आपल्या दातांच्या फटीत अडकलेले दिसत आहेत. ॥ ११-२६, ११-२७ ॥

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति । तथा तवामी नरलोकवीरा विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ॥ ११-२८ ॥

ज्याप्रमाणे नद्यांचे पुष्कळसे जलप्रवाह स्वाभाविकच समुद्राच्याच दिशेने धाव घेतात अर्थात समुद्रात प्रवेश करतात, त्याचप्रमाणे ते मनुष्यलोकातील वीर आपल्या प्रज्वलित तोंडात शिरत आहेत. ॥ ११-२८ ॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा विशन्ति नाशाय समृद्धवेगाः । तथैव नाशाय विशन्ति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ ११-२९ ॥

जसे पतंग नष्ट होण्यासाठी पेटलेल्या अग्नीत अतिशय वेगाने धावत शिरतात, तसेच हे सर्व लोकही स्वतःच्या नाशासाठी आपल्या तोंडात अतिशय वेगाने धावत प्रवेश करीत आहेत. ॥ ११-२९ ॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः । तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥ ११-३० ॥

आपण त्या सर्व लोकांना प्रज्वलित तोंडांनी गिळत गिळत सर्व बाजूंनी वारंवार चाटत आहात. हे विष्णो, आपला प्रखर प्रकाश सर्व जगाला तेजाने पूर्ण भरून तापवीत आहे. ॥ ११-३० ॥

# कल्याणच्या गांधारी ब्रिजवर भीषण अपघात

## रिक्षाला धडक देऊन गांधारी नदीमध्ये डंपर पडला

### रिक्षाच्या चक्काचूर मध्ये एक महिला मृत्युमुखी तर दोन जण गंभीर जखमी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिम येथील गांधारी ब्रिजवर मंगळवारी सकाळी डंपर आणि रिक्षा धडकेत रिक्षातील एक महिला मृत्युमुखी तर दोन जण गंभीर जखमी झाल्याने भीषण अपघात झाला. तर रिक्षाला धडक देऊन डंपर थेट ब्रिजचे कठडे तोडून नदीमध्ये पडल्याची घटना घडली आहे. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये रिक्षाचा चक्काचूर झाला आहे.

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कल्याण पश्चिमेतील गांधारी ब्रीजवर कल्याण कडून पडघ्याकडे जाणाऱ्या डंपरची बापगावाकडून कल्याण कडे येणाऱ्या रिक्षाची भीषण धडक मंगळवारी सकाळी 7.30वा.सुमारास झालेल्या घटनेत रिक्षाचा चक्काचूर झाला. तर डंपर पुलाचा संरक्षक कठडा तोडून डंपर गंधारी खाडी पात्राच्या पाण्यात पडला. या भीषण अपघातात रिक्षा मधील रिक्षाचालक निलेश वानखेडे (27) यांची आई मंगल वानखेडे (55) रा. बापगाव जय मल्हार नगर हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. निलेशसह एक महिला जखमी झाली. घटना प्रसंगी निलेश आईला वाचवा अशी आर्त हाक पुलावर जमलेल्या ना करीत होता. पण माणुसकी हरपत चालेल्या या युगात बघी मंडळी




मोबाईल द्वारे व्हिडिओ आणि फोटो शूट काढण्यात रंगली होती.

डंपर चालक आजम अली याने उडी मारीत स्वतचा जीव वाचवित थेट पोलीस स्टेशन गाठले असल्याचे समजते. घटनास्थळी तातडीने पोलीस यंत्रणांनी पोहचली. तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी खाडी पात्रातील पाण्यात शोधकार्य सुरू केले. घटनास्थळी तहसीलदार यांनी भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. हा भीषण अपघात नेमका कशामुळे झाला हे कारण अद्याप देखील समजू शकले नाही. पोलिस तपासा अंती नेमके काय कारण होते हे समजेल. गंधारी पुलावरील या भीषण अपघातामुळे पुलावरील वेग मर्यादा आणि सावधनाता आणि वाहतूक नियमांची कडकपणे अमंलबजावणी प्रश्न ऐरणीवर आला असल्याचे दिसून येत आहे.

# बहुविध प्रतिभेचे धनी

## डॉ. जयंत नारळीकर काळाच्या पडद्याआड



लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे काल म्हणजे २० मे रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञानकथेसारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञानासारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रचचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. डॉ जयंत नारळीकर यांना भावपूर्ण श्रद्धाजली !

# जेएसडब्ल्यू कंपनीचा सि.एस.आर फंड खारेपाटातील पाणी समस्येसाठी वापरावा- सी.आर.म्हात्रे यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण खारेपाट विभागासाठी शहापाडा धरणाचे पाणी डिसेंबर पासून पिण्यायोग्य नसते ,त्यामुळे गढुळ, अशुद्ध पाण्याचा पुरवठा होतो.आणि हेच पाणी पिण्यासाठी वापरल्यामुळे त्वचेचे आजार ,खरूज, अंगावर तांबडी पुरळ, पोटाचे विकार, मूत्र विकार,काविळ हा जीवघेणा आजार,पोटातली काविळ लवकर समजली नाहीतर,कितीही उपचार केले तरी जीवावर बेतते गतवर्षी याची प्रचिती आली.दोन निष्पाप शाळेतील मुलाचा बळी गेला,याही वर्षी सरकारी,खाजगी दवाखान्यात खारेपाटातील नागरिक उपचार घेतात,मात्र, दरवर्षी हेच रडगाणे.

नेहमीपेक्षा मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. नागरिक त्रस्त झालेत,तीन दिवस साठलेले पाणी,ते जपून वापरायचे,विकत पाणी आणण्याचे त्यासाठी गृहिणींचा बजेट बिघडतो,विकत पाणी कमीच प्यायला जातो. डिसेंबर नंतर हक्काचे हेटवणे धरणातून पाणी लिफ्ट करून शहापाडा धरणात सोडून पाणी टंचाई दूर करण्यासाठी खटाटोप केली जाते पण टँकर लॉबी शिवाय पर्याय नाही.म्हणजे आम्ही पाण्यासाठी कमनशिबी,कित्येक निवडणुका झाल्या. नेते, आले गेले कित्येक आंदोलने झाली,पायपीट मुंबईपर्यंत केली,निधी मिळाला,संपला, पण सर्व कडे घागर रिकामीच. सर्वपक्ष हरले जनता हरली,कंत्राटदार जिंकले.. नियोजन शून्य व्यवस्था आहे. JSW कंपनी पाइपसाठी कोट्यवधी रुपये खर्च करते,CSR फंड लोकहितासाठी वापरत आहे.जर त्या फंडाचा वापर निःस्वार्थपणे केला गेला तर हेटवणे धरणातून डायरेक्ट



खारेपाट विभागात पाणी आणता येईल फक्त एक वर्ष कोणत्याही कामासाठी निधी गावासाठी मागू नये.पण बऱ्याच जणांची एक वर्षासाठी उपासमार होईल. दुसरा पर्याय हेटवणे धरणाचे वाया जाणारे पाणी तारणखोप ते भाल अशी पाईप लाईन टाकून एक यशस्वी प्रयोग करावा.कारण वाशी नाका ते वाशी ही नवीन वसाहत होत आहे त्यांनी नळ कनेक्शन घेतले की खारेपाट विभागात पाणी पोहचू शकणार नाही. त्यामुळे तरणखोप ते भाल यासाठी खासदार धैर्यशील पाटील खासदार सुनिल,तटकरे आणि आमदार रवींद्र पाटील तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनावर घेऊन,Jsw चे CSR फंड याचा एक वर्षासाठी वापरण्याचे आदेश दिले तर एका वर्षात काम होऊ शकेल. मात्र कार्यकर्त्यांनी एक वर्षासाठी नाराजी सहन करावी लागेल.

पण तारणखोपची ही योजना यशस्वी केली तर खारेपाट पाण्यासाठी नशिबवान ठरेल.अशी मागणी वाशी खारेपाटातील जनतेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी केली आहे

JSW कंपनीने प्रत्येक गावात भरपूर कामे केली आहेत.त्यांचे बोर्ड दिसतात ,आरोग्य शिबिर घेणे,बचत गटांना सक्षम बनवणे त्यांचे हे योगदान पाण्यासाठी वापरून ही साडेसाती संपू दे एकदाची...

JSW कंपनी ने शाळा ग्रामपंचायत यांना निधी देऊन सुधारणा घडवून आणली तशीच पाण्यासाठी हा CSR फंड एक वर्षाचा आपल्या विभागासाठी द्यावा असे माझ्या खारेपाटातील जनतेचे मत आहे आणि पूर्णत्वास जाणे यामध्ये अडचणी असतात त्या अडचणी चांगल्या कामासाठी दूर होतील व वर्षभरात वाशी खारेपाटातील पाणी समस्या सुटणार यात तिळमात्र शंका नाही असेही सी.आर.म्हात्रे यांनी सांगितले.

# मुरबाड ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे जांभूळ शेती संकटात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : ठाणे जिल्हासह मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात तसेच मुरबाड शहर परिसरात बदलत्या हवामान बदलाचा फटका रानमेवा असणाऱ्या जाभळांना बसत असून अवकाळी पावसामुळे जांभूळ पीक संकटात आले आहे. अशी माहिती मुरबाड तालुक्यातील शेतकरी योगेश म्हारसे यांनी दिली आहे

दरवर्षी मे महिन्यात आदिवासी महिला जंगलातून काळयाभोर रंगाची जांभळे जमा करून आणतात व पळसाचा द्रोण करून त्यातून आपला उदरनिर्वाह करतात. अनेक शेतकऱ्यांना ही बहाडोली प्रकारची जांभूळ वृक्ष लागवड करून व्यापारी तत्त्वाने शेतीला सुरुवात केली आहे.

सध्या मुरबाड तालुक्यात पर्यावरणीय बदलामुळे आंबा उत्पादन घटले असून यावर्षी जाभलांचे पीक मात्र चांगले आल्याचे स्पष्ट चित्र होते. शिवाय गावठी किंवा रानात उपलब्ध जांभळे हो रसायन मुक्त असून आरोग्य शक्ती वर्धक आहे मधमेह जांभळाच्या बिया एक उत्तम औषध आहेत.



अवकाली पडणारा पाऊस सोसाट्याचा वादळ वारा यामुळे झाडावरची जांभळे खाली पडून वाया जात आहेत शिवाय त्यांची कोणतीही स्वतंत्र लागवड करत नाही त्यामुळे यंदा अवकाळी पावसाने जांभुळ पिकावर मोठे संकट आणले आहे.


**जांभळापासून सरबत ,ज्यूस, जांबुळवडी, बियांचे चूर्ण बनवलेले तर शेतकऱ्यांना लघुउद्योग निर्माण होईल.**
**– योगेश म्हारसे,शेतकरी,केदुली/मुरबाड**

# एमआयडीसीच्या प्रदूषणामुळे डोंबिवलीकर त्रस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : एमआयडीसी विको नाका, उस्मा पेट्रोल पंप, आर आर हॉस्पिटल परिसरात काल सोमवारी सायंकाळी साडेपाच सहा दरम्यान सर्वत्र गॅस पसरला होता आणि तो सभोवतालच्या वातावरण मध्ये दिसत असल्याचे काही जणांनी प्रत्यक्ष पाहिले असल्याचे समोर येत आहे. मिलापनगर मध्ये राहणारे डॉक्टर राजन माने हे त्या परिसरातून सोमवारी जात असताना त्यांना हा तीव्र वास, गॅस जाणवला. त्यांनी याविषयी मानपाडा पोलिसाना कळवले आहे.

सदर हा तीव्र गॅस परिसरात पसरण्या बाबत अनेक नागरिकांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. काही दिवसांपूर्वी म्हणजे 7 एप्रिल



2025 रोजी आकाशातून वाहनांवर, लोकांच्या कपड्यावर काळसर ठिपके, डाग पडल्याची विचित्र घटना एमआयडीसी परिसरात घडली होती. नागरिकांनी ही बाब प्रदूषण नियंत्रणमंडळाला कळविल्यानंतर त्यांनी आणि कामा या औद्योगिक संघटना यांनी या घटनेची परिसरात फिरून चौकशी केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाने याचे काही नमुने घेवून ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले होते. सदर घटना कशामुळे घडली आणि प्रयोगशाळा तपासणी अहवालातून काय निष्पन्न झाले हे अद्याप अधंतरित आहे. याबाबत काही लोकांनी पाठपुरावा करूनही त्यांना माहिती मिळाली नाही.

काल सोमवारी सायंकाळी परिसरात तीव्र गॅस पसरण्याची जी घटना घडली त्याची सखोल चौकशी करावी. येथील नागरिकांचा प्रदूषण नियंत्रण मंडळावर विश्वास राहिला नसून आता याची दखल स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेवून कारवाई करावी अशी मागणी येथील लोक करीत आहेत.

याबाबत स्थानिक डॉ. राजन माने यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, मी विको नाका मुख्य रस्त्यावरून येत असता मला उग्र वास व धूर्कटपणा दिसून. त्यामुळे मी मानपाडा पोलिस ठाणे येथे फोन केला पण संपर्क झाला नाही. त्यानंतर मी व्हॉटसअप माध्यमातून ही बाब आमच्या निवासी ग्रुपवर पोस्ट केली असे सांगितले. याबाबत कामा अधिकाऱ्यांनी सांगितले की आमच्यापर्यंत ही बाब आली नाही. तर प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी वाघमारे यांच्याशी संपर्क केला असता तो होवू शकला नाही.

# खाद्यसंस्कृती

## काकडीचे थालीपीठ



साहित्य :
काकडीचा किस - 3 कप
लाल तिखट - 2 चमचे
जिरेपूड - 1 चमचा
हळद - 1 चमचा
गव्हाचे पीठ - अर्धी वाटी
तांदळाचे पीठ - अर्धी वाटी
बेसन - अर्धी वाटी
ओवा - 1 चमचा
लसणाच्या पाकळ्या - 3 ते 4
कोथिंबीर -,मीठ,तेल

कृती : काकडी स्वच्छ धुवून घ्यावी. यानंतर काकडीचा देठाकडील भाग कापून घ्यावा.काकडीचा किस तयार करून घ्यावा.एका बाऊलमध्ये काकडीचा किस, लाल तिखट, हळद, ओवा, जिरेपूड, लसणाच्या पाकळ्या, चवीपुरते मीठ टाकून एकजीव करून घ्या.
तयार मिश्रणात गव्हाचे पीठ, तांदळाचे पीठ, बेसन घाला.
सर्व मिश्रण एकजीव करून पीठ मळून घ्या.तयार पीठाचे लहान लहान गोळे तयार करून घ्या.आता पोलपाटावर ओला रुमाल टाकून पिठाचे थालीपीठ थापून घ्यावे.
तव्यावर तेल सोडून दोन्ही बाजूने हे थालीपीठ खरपूस भाजून घ्यावे.
अशा पद्धतीने तयार झाले आहे काकडीचे खमंग थालीपीठ.




# गृहनिर्माण धोरणाचा सर्वंकष आराखडा मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा

## – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : गृहनिर्माण धोरणाच्या माध्यमातून सर्वांसाठी घरे या संकल्पनेला प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. हे धोरण सर्वसमावेशक असणार असून, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार महिला, विद्यार्थी आणि औद्योगिक कामगार यांसारख्या विविध समाजघटकांचा समावेश यात करण्यात आला आहे. प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाचा सर्वंकष आराखडा मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर गृहनिर्माण धोरणासंदर्भात सादरीकरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव विकास खारगे, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असिम गुप्ता उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढते शहरीकरण आणि घरांची वाढती मागणी लक्षात घेता, सर्व समाजघटकांसाठी सुरक्षित व परवडणारी घरे या धोरणाच्या माध्यमातून उपलब्ध होतील.या बैठकीत गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंह यांनी गृहनिर्माण धोरणाची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.



# रांजनोली ते दुर्गाडी पर्यंत वाहने उभी करण्यास वाहतुक पोलिसांनीकडून बंदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथील रांजनोली ते दुर्गाडी पर्यंत मोठ्याप्रमाणात लोकवस्ती वाढली आहे. तसेच या भागात व्यवसायिक दुकाने देखील आहे. येथे रस्त्यालगत वाहन चालक बेशिस्तपणे वाहने उभी करत असतात. त्यामुळे वाहतुक कोंडी होत असते.

ठाणे वाहतुक पोलिसांनी या मार्गावरील रांजनोली नाका ते दुर्गाडी पर्यंत वाहने उभी करण्यास बंदी घातली आहे. त्यासंदर्भाची अधिसूचना पोलिसांनी काढली आहे. ३० दिवसांच्या प्रायोगिक तत्त्वावर ही अधिसूचना लागू असेल. याबाबत हरकती असल्यास त्या तीन हात नाका येथील ठाणे वाहतुक पोलिसांच्या कार्यालयात पाठविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

रांजनोली ते दुर्गाडी भागात ठिकठिकाणी दुकाने आहेत. या दुकानांमध्ये ठाणे, भिवंडी, कल्याण भागातील हजारो नागरिक खरेदीसाठी येत असतात. तसेच या भागात लोकवस्ती वाढली आहे. या मार्गालगत ठिकठिकाणी वाहने उभी केली जातात. हा मार्ग महत्त्वाचा असल्याने वाहने उभी केल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी या मार्गावरील रांजनोली नाका ते दुर्गाडी या पाच किलोमीटर अंतरावर दुतर्फा वाहने उभी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच रांजनोली ते भादवड नाका या मार्गावरही दुतर्फा वाहने उभी करण्यास बंदी आहे. त्यासंदर्भाची अधिसूचना ठाणे वाहतुक पोलिसांनी काढली आहे.

प्रायोगिक तत्त्वावर ३० दिवसांसाठी ही अधिसूचना लागू असेल. या अधिसूचने बाबत कोणाची हरकत असल्यास हरकती लेखी स्वरूपात तीन हात नाका येथील वाहतुक विभागाच्या पोलीस उपायुक्त कार्यालयात पाठविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. हरकती किंवा आक्षेप आल्या नाही तर अधिसूचना कायम स्वरुपात अमलात राहिल असे पोलिसांनी स्पष्ट केले.

# टेंभी नाक्यावर शिंदे गटाच्या माजी नगरसेवकावर हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शिवसेना शिंदे गटाचे माजी नगरसेवक सुधीर कोकाटे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांवर टेंभीनाका परिसरात चॉपरने हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. यात कोकाटे यांचे एक सहकारी जखमी झाले आहे. काही दिवसांपूर्वीच सुधीर कोकाटे यांच्या मुलावर नौपाडा पोलीस ठाण्यात एका तरुणावर हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. याप्रकरणातूनच हा हल्ला झाल्याची माहिती समोर येत आहे. टेंभीनाका शाखा ही आनंद आश्रमापासून अवघ्या दोन मिनीटांच्या अंतरावर आहे.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**-: जाहीर सूचना :-**

ज्याअर्थी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्र. ३ मधील मौजे-कल्याण (प.) विभागातील सह्याद्री नगर चौकापासून म्हाडा वसाहतीमधून पुढे बी. के. चौकापर्यंत (नकाशात दर्शविल्याप्रमाणे A-B-C-D-E) मंजुर विकास योजनेतील रस्ता नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधनियम १९४९ चे कलम २१० अन्वये रस्ता विकसीत करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

ज्याअर्थी, सर्वेक्षण नकाशाच्या प्रतीवर वरील नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर अस्तित्वातील रस्ता सरासरी ८.५० ते ९.०० मी. रुंदीचा साधारण २२०.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता उपलब्ध असून सदर रस्त्यामधील बहुतांश जागा म्हाडाच्या मालकीची आहे. (लेआऊटमधील रस्त्याखालील जागा) सदर रस्त्याचे रूंदीकरण केल्यास रस्त्याची कन्टीन्यूटी होऊन विकास योजनेतील १८.०० मी. रुंद रस्त्याशी संलग्नता प्राप्त होईल. तसेच सदर परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, तसेच त्याप्रमाणे वाढणारी वाहतूक व आरोग्य सेवा इत्यादी बाबींचा विचार करुन जनहिताच्या दृष्टीने उक्त रस्ता (नकाशात दर्शविल्याप्रमाणे A-B-C-D-E) ९.०० मी. रुंद करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. सदरच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या रूपरेषा मा. आयुक्त महोदय यांच्या दि.०७/०५/२०२५ रोजीच्या मान्यतेने विहीत करण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर सुचनेद्वारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, उक्त रस्ता ९.०० मी. रुंद करून त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रेषा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात उपलब्ध असलेल्या नकाशाप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही; याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सूचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "२/ब प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/१४२
दिनांक : २० मे २०२५

सही/-
(स. ना. डोईफोडे)
सहाय्यक संचालक नगररचना,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

### प्रभावशून्य यंत्रणा आणि बेसुमार खड्ड्यांमुळे

# बदलापूर परिसरात दैनंदिन वाहतूक कोंडी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** गेल्या काही दिवसांपासून बदलापूर पूर्वेतील भुयारी मार्गाजवळचा कात्रप परिसरातील चौक कोंडीचा ठरू लागला आहे. येथे रस्त्याच्या कडेला सुरू असलेले खोदकाम, चारही बाजूंनी येणारी वाहने, त्यांच्या नियमानासाठी नसलेली यंत्रणा यामुळे ही कोंडी होत असून स्थानिक प्रवाशांसह पुणे, कर्जतहून कल्याण, डोंबिवलीच्या दिशेने प्रवास करणाऱ्यांनाही याची झळ बसते आहे. त्यामुळे प्रवाशांत संतापाचे वातावरण आहे. रविवारीही अशाच प्रकारे वाहतूक कोंडी झाली.

गेल्या काही वर्षात बदलापूर, अंबरनाथ शहरांत मोठ्या प्रमाणावर वाहने वाढली. परिणामी रस्त्यावर त्याचा भार दिसून येतो. या दोन्ही शहरांमध्ये वाहतूक नियंत्रण ही मोठी समस्या उद्भवू लागली आहे. अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात काही महिन्यांपूर्वी सिग्नल यंत्रणा उभारण्यात आली. त्यामुळे वाहतूक कोंडी सुटेल अशी आशा होती. मात्र तरीही कोंडी कायम आहेच. सिग्नलच्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला उभी केली जाणारी वाहने, सिग्नलच्या ठिकाणी झालेले आणि दुरूस्त न केलेले खोदकाम, बेशिस्त वाहनचालक यामुळे कोंडी सुरूच आहे.

त्यात रविवारी बदलापूर पूर्वेतील कात्रप भाग बेशिस्त वाहनचालकांमुळे कोंडीत अडकला. सायंकाळी सहाच्या सुमारास बदलापुरच्या भुयारी मार्गाजवळच्या पूर्वेतील चौकात कोंडी होण्यास सुरूवात झाली. बदलापूर पश्चिमेतून भुयारी मार्गाद्वारे येणारी वाहने थेट चौकातून अंबरनाथ किंवा प्रस्तावित पनवेल मार्गाकडे वळण घेत होती. त्याचवेळी अंबरनाथहून येणाऱ्या वाहनांच्या रांगा या मार्गावर लागल्या.

बदलापूरहून अंबरनाथच्या दिशेने जाणारी वाहने याच चौकात अडकून पडू लागली. त्यामुळे या चौकापासून थेट कात्रपच्या जुन्या चौकापर्यंत वाहनांच्या रांगा लागत होत्या. अनेक स्थानिक प्रवाशांनी उलट दिशेने वाहने वळवून आपली सुटका करून घेतली. मात्र बाहेरच्या गावाहून आलेल्या अनेक वाहनांना खोळंबून राहावे लागले.

# पावसामुळे मुरबाड शहापूर तालुक्यातील व्यापारी आणि बाजारपेठांचे नुकसान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड,** ता. १७ तालुक्यामध्ये सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे मुरबाड, सरळगाव, धसई, टोकावडे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. सध्या लोकांची पावसाळी हंगापावसामुळे मुरबाड, सरळगाव, धसई, टोकावडे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे नुकसान झाले आहे.

### कांदा, लसणाचे भाव वाढले

**मागील आठवड्यात ५५ किलो कांद्याच्या गोणीसाठी ७०० रुपये भाव होता. या आठवड्यात हा भाव ८०० ते ९०० रुपये याप्रमाणे वाढला आहे. काही दुकानांत एक हजार रुपये प्रति गोण भाव आकारला जात आहे. कांद्याची खरेदी गोणीच्या हिशोबात केली जात असल्याने मालाला उठाव जास्त आहे. लसणाचा भावसुद्धा १३० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. मागील आठवड्यात तो १०० रुपये किलो होता.**

तालुक्यामध्ये सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे मुरबाड, सरळगाव, धसई, टोकावडे बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. सध्या लोकांची पावसाळी हंगामासाठी किराणा माल, सुकी मच्छी, मसाला पदार्थ, कांदे, बटाटे, लसूण इत्यादी वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे.

त्यासाठी खेडोपाड्यातून लोक बाजारात येत आहेत. मुरबाड शहरात दर शुक्रवारी भरणाऱ्या बाजारात पावसामुळे अनेक व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील लोक शेतीच्या कामामुळे पावसाळ्यात व्यस्त असतात. हे लोक बाजारपेठेत येण्याचे टाळतात. त्यामुळे जून ते सप्टेंबर अशा चार महिन्यांसाठी लागणारा किराणा माल, कडधान्य, सुकी मासळी, कांदे, लसूण अशा वस्तूंचा साठा करून ठेवला जातो.

मागील आठवड्यात ५५ किलो कांद्याच्या गोणीसाठी ७०० रुपये भाव होता. या आठवड्यात हा भाव ८०० ते ९०० रुपये याप्रमाणे वाढला आहे. काही दुकानांत एक हजार रुपये प्रति गोण भाव आकारला जात आहे. कांद्याची खरेदी गोणीच्या हिशोबात केली जात असल्याने मालाला उठाव जास्त आहे. लसणाचा भावसुद्धा १३० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे. मागील आठवड्यात तो १०० रुपये किलो होता.मासाठी किराणा माल, सुकी मच्छी, मसाला पदार्थ, कांदे, बटाटे, लसूण इत्यादी वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे. त्यासाठी खेडोपाड्यातून लोक बाजारात येत आहेत.

मुरबाड शहरात दर शुक्रवारी भरणाऱ्या बाजारात पावसामुळे अनेक व्यापाऱ्यांचे नुकसान झाले. ग्रामीण भागातील लोक शेतीच्या कामामुळे पावसाळ्यात व्यस्त असतात. हे लोक बाजारपेठेत येण्याचे टाळतात. त्यामुळे जून ते सप्टेंबर अशा चार महिन्यांसाठी लागणारा किराणा माल, कडधान्य, सुकी मासळी, कांदे, लसूण अशा वस्तूंचा साठा करून ठेवला जातो.

# नवी मुंबई महानगर पालिकेतील अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई:** नवी मुंबई मनपा मुख्यालय आणि विभाग कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्याचे आदेश देण्यात आले आहेत. या बदल्या सेवा जेष्ठतेनुसार केल्या गेल्या आहेत. नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशानव्ये प्रशासकीय आधिकारी या संवर्गातील आधिकारी यांची सहाय्यक आयुक्त या संवर्गात सेवा ज्येष्ठतेनुसार अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहे. सामान्य प्रशासन विभागात असणारे उत्तम खरात यांची घणसोली विभाग आधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली असून भांडार विभागामध्ये असणाऱ्या शिल्पा देशपांडे यांची परवाना विभागात बदली करण्यात आली आहे. मालमत्ता कर आकरणी विभागात असणारे नैनेश बदले यांची दिघा विभाग अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली असून स्थानिक संस्था कर विभागांमध्ये असणारे सुखदेव येडवे यांची वाशी विभाग कार्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे. परिमंडळ १ मध्ये असणारे अरुण पाटील यांची अतिक्रमण विभागात बदली करण्यात आली आहे. अलका महापुरकर यांची वाशी विभाग कार्यालयातून मालमत्ता कर आकरणी विभागात बदली करण्यात आली आहे. घणसोली विभाग कार्यालयात असणारे स्वरुपा परळीकर यांची सामान्य प्रशासन विभागात बदली करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे बेलापूर विभाग कार्यालयात असणारे विलास वाव्हाळ यांची निवडणूक विभागात बदली करण्यात आली आहे.

# पेंढरकर महाविद्यालयातील शिक्षकांकडून आ. ज्ञानेश्वर म्हात्रेंचे आभार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवलीतील प्रथितयश महाविद्यालय खाजगी करून गोर गरिबांच्या शिक्षणाची दारे बंद करण्याचा घाट घालणाऱ्या व्यवस्थापनाच्या विरोधात आजी माजी विद्यार्थी,शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जो लढा उभारला त्याला अगदी पहिल्या दिवसापासून साथ देणारे कोंकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी मोलाची साथ दिली.14 जून रोजी सेव्ह पेंढरकर कॉलेज मोहिमेच्या माध्यमातून



महाविद्यालयात येऊन व्यवस्थापनाच्या विरोधात म्हात्रे सरांनी आंदोलकांना धीर देऊन एका न्यायिक लढ्याला पाठिंबा दिला.मुख्य म्हणजे विधान परिषदेत पेंढरकर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाच्या अन्यायाविरुद्ध सरांनी आवाज उठवला तसेच माजी मंत्री श्री.रवींद्र चव्हाण साहेब ,खासदार श्री.श्रीकांत शिंदे साहेब, पदवीधर आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब ,आमदार श्री राजेश मोरे साहेब तसेच स्थानिक शिवसेना ,भाजप पक्षाचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी आणि नागरिक त्यांनी खूप सहकार्य केले.

सेव्ह पेंढरकर कॉलेज मोहिमेचे आयोजक सोनू सुरवसे यांनी सतत अकरा महिने या प्रश्नावर आंदोलन केले. म्हात्रे सरांसारख्या शिक्षणाच्या बाबतीत संवेदनशील आमदारांनी महाराष्ट्र शासन आणि जनतेचे या प्रश्नाकडे लक्ष वेधल्याचा परिणाम म्हणून दिनांक 29 एप्रिल 2025 रोजी शिक्षण संचालक,उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा.श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी पेंढरकर महाविद्यालयावर तीन वर्षासाठी प्रशासकाची नियुक्ती केली व व्यवस्थापनाच्या अन्यायकारक वागणुकीतून विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची मुक्तता केली. या कारणास्तव पेंढरकर महाविद्यालयातील शिक्षकांच्या शिष्ट मंडळाने आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे सरांची भेट घेऊन, त्यांचे आभारही व्यक्त केले.

# मुंब्रा स्थानक परिसरात आढळला अजगर!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - मुंब्रा रेल्वे स्थानक जवळील मुंब्रा देवी रस्त्याच्या एका बाजूला अजगर प्रजातीचा सर्प आढळल्याची घटना सोमवारी रात्री उशिरा उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच, वाईल्डलाईफ वेल्फेअर असोसिएशन चे कर्मचारी तेथे पोहोचले आणि त्यांनी त्या अजगरची सुखरुप सुटका करुन पुन्हा जंगलात सोडले असल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. मुंब्रा रेल्वे स्थानक जवळील मुंब्रा देवी रस्त्याच्या एका बाजूला अजगर प्रजातीचा सर्प आढळल्याची घटना सोमवारी रात्री उशिरा उघडकीस आली.

मुंब्रा शहराच्या आजूबाजूला डोंगर आणि खाडी परिसर आहे. या जंगलात तसेच खाडीत अनेक प्राण्यांचा अधिवास असल्याचे पाहायला मिळते. त्यामुळे अनेकदा या जंगलातून किंवा खाडीतून प्राणी नागरी वस्तीत येतात. अशाचप्रकारे सोमवारी रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास मुंब्रा रेल्वे स्थानक परिसातील मुंब्रा देवी रस्त्यावर एका दुकानाजवळ अजगर प्रजातीचा सर्प आढळून आला. याची माहिती स्थानिकांनी तात्काळ वाईल्डलाईफ वेल्फेअर असोसिएशनला दिली. माहिती मिळताच या संस्थेचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी त्या अजगराची सुखरुप सुटका केली. हे अजगर जंगल परिसरातून आले असावे असा अंदाज या संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या अजगराला सुखरुप पकडून जंगलामध्ये सुरक्षित सोडण्यात आले आहे.



# खाजगी विकासकांना पाणीपुरवठा ?

## कसाऱ्यात कृत्रिम पाणीटंचाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
भरत उबाळे

**शहापूर :** तलावापासून पाचशे मीटर अंतरापर्यंत बोअरवेल अथवा विहिर खोदण्यास मनाई असतांना विहिर खोदल्यामुळे तसेच कालव्याचे पाणी देखील खाजगी बांधकाम विकसकांस उचलू दिल्यामुळे ५० हजार लोकसंख्येच्या कसारा गावांत कृत्रिम पाणीटंचाई सुरु झाली असल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेचे तालुका संघटक चंद्रकांत जाधव यांनी केला आहे.

खाजगी विकसकांस नाल्याचे पाणी उचलू देऊ नये तसेच तलाव परिसरात मनाई असतांना विहिरी खोदण्यास ग्रामपंचायतीने परवानगी कशी दिली ? या संपूर्ण प्रकारणाच्या चौकशीची मागणी जाधव यांनी केली असून याबाबत त्यांनी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांना निवेदन दिले आहे. तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात जाधव यांनी म्हटले आहे की, धोबीपाडा, मोखावणे आणि कामडीपाडा येथे पाणीटंचाई निर्माण झाली आहे. कामडीपाडा व धोबीपाडा येथे पाणीपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक विहिरी आटल्या आहेत. गावकऱ्यांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे.

तालुक्यात सर्वत्र पाणीटंचाई सुरु असतांना कसाऱ्यातील ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी चंद्रकांत जाधव यांनी केली आहे.

# महिला आयपीएस अधिकाऱ्याचा पती गजाआड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** सरकारी कोट्यातून स्वस्तात घर देण्याचे आमिष दाखवून शीव येथील व्यावासायिकासह इतरांची २४ कोटी ७८ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली आर्थिक गुन्हे शाखेने पुरुषोत्ताम चव्हाण याला अटक केली. मुख्य आरोपी चव्हाण हे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे पती आहेत. याप्रकरणी चव्हाण यांच्यासह ११ जणांविरोधात गुन्हा दाखल आहे. सक्तवसुली संचलनालय (ईडी) तपास करीत असलेल्या २६३ कोटींच्या प्राप्तिकर गैरव्यवहाराप्रकरणाच्या तपासात याबाबती माहिती मिळाली होती.

याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने तपास करून फेब्रुवारी महिन्यात कुलाबा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत असून त्यांनी मंगळवारी चव्हाण याला अटक केली. चव्हाण यांच्यासह तोतया अधिकारी प्रसाद देसाई, संजय पाटील, गणेश पाटील, दीपक मोरे, एन. डी. निर्मले. गोविंद सावंत, शशांक लिमये, यशवंत पवार, सह दुय्यम अधिकारी (खरा अथवा तोतया अधिकारी) व कागदपत्रे बनवण्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणारी व्यक्ती यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे.

# अवकाळी पावसाचे मिठावर पाणी

## तयार मीठ सुरक्षित करण्यासाठी मिठागरांवर लगबग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**वसई:** पावसाळा तोंडावर आला असल्याने तयार झालेले मीठ सुरक्षित ठेवण्यासाठी मीठ उत्पादकांची लगबग सुरू झाली आहे. वसईच्या विविध ठिकाणच्या मिठागरात तयार झालेले मीठाच्या राशीवर गवत व त्यावर कापड टाकून बंदिस्त केले जात आहे.



वसई विरार च्या भागात मोठ्या प्रमाणात पारंपारिक मीठ व्यवसाय केला जात आहे. वसईतील जूचंद्र, नायगाव, उमेळे, उमेळमान, राजावली, नवघर पूर्व परिसर, पाणजू, यासह इतर ठिकाणी मीठ पिकविले जाते. यंदाही अवकाळी पावसाला तोंड देत विविध ठिकाणच्या मिठागरात मीठ उत्पादकांनी मशागत करून मीठ तयार करण्यात आले आहे. फेब्रुवारी ते मे अखेर पर्यंतचा मीठ उचलण्यासाठीचा महत्वाचा हंगाम असतो यावेळी तयार झालेले मीठ व्यापाऱ्यांकडून खरेदी केले जाते. मात्र मे महिन्याच्या सुरवातीलाच अवकाळी पावसाने फटका दिल्याने मीठ उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. आता पावसाळा तोंडावर येऊन ठेपला आहे. याशिवाय मागील काही दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे कधीही पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. आता उरले सुरले मीठ सुरक्षित राहावे यासाठी मीठ उत्पादकांची धावपळ सुरू असून ते बंदिस्त करण्यास सुरूवात केली आहे. तयार केलेली मिठाची रास कोसळू नये व योग्य रित्या त्यावर चारही बाजुंनी सपाटीकरण करण्यात आले आहे. ते गवताचे आवरण देऊन नंतर कापड टाकून ते बंदिस्त केले जात आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त



# ठाकरेंच्या शिवसेनेमुळे डोंबिवलीतील रेल्वे पार्किंग सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** अनेक दिवसांपासून बंद असलेले पश्चिमेकडील बंद असलेले रेल्वे प्रशासनाकडून पे अँड पार्क शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आंदोलनामुळे सुरु झाले. दोन महिन्यापूर्वी ठाकरेंच्या शिवसेनेने पश्चिमेकडील रेल्वेचे पे अँड पार्क सुरु करावे याकरिता कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन केले होते. या आंदोलनाची दाखल घेऊन रेल्वे प्रशासनाने पे अँड पार्क सुरु केले. मंगळवारी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांची भेट घेतली. सदर सुरू झालेल्या रेल्वेचे पे अँड पार्क मध्ये कोणत्याही प्रकारची फसवेगिरी होवू नये याची दखल घेतली पाहिजे असे ठणकावून सांगितले. पूर्वी अशाच प्रकारच्या रेल्वेचे पे अँड पार्क मध्ये जाणूनबुजून घोटाळा केला जात होता. जास्त पैशाची मागणी करण्यात येत होती. पार्किंग करणाऱ्या गाडी मालकांना दमदाटी केली जात होती असे प्रकार पुन्हा सहन केले जाणार नाही असा इशाराही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिष्टमंडळाने दिला. यावेळी सचिव सुरेश परदेशी, महिला शहर संघटिका प्रियंका विचारे, रिचा कामतेकर, होकर्स युनियन सुरज पवार, उपशहर प्रमुख शाम चौगले, राहुल चौधरी, उपशहरप्रमुख संजय पाटील, विभागप्रमुख राजेंद्र सावंत, प्रकाश कदम, ऋतुनिल पावस्कर, सुनील पवार, अनिल मोटार, मंदार निकम, भगवान कदम, ज्ञानेश्वर मराठे, अंकुश सूर्यवंशी, राजेश मोहिते, अर्जुन मोरया, आरती उत्तेकर, सानिका खाडे, प्रिया दांडगे, सविता शिगवण, भारती नाचरे आदी उपस्थित होते.

## १ जून ते ३१ जुलै कालावधीत
# महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधि क्षेत्रात मासेमारी बंदी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम 1981 व सुधारणा अध्यादेश, 2021 अन्वये यावर्षी दि.1 जून ते 31 जुलै 2025 (दोन्ही दिवस धरुन 61 दिवस) या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रीय जलधि क्षेत्रात यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां) रायगड-अलिबाग संजय पाटील यांनी केले.

या बंदी कालावधीत सागरी कायद्याचा भंग करुन मासेमारी करणारे मच्छिमार खालील कारवाईस पात्र होतील.सदर पावसाळी मासेमारी बंदी यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकांना लागू राहील. सदर पावसाळी मासेमारी बंदी ही पारंपारिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बिगर- यंत्रचालित नौकांना लागू राहणार नाही. समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौका दि. 1 जून 2025 पूर्वी मासेमारी बंदरात परतणे बंधनकारक आहे. तसेच दि. 31 जुलै 2025 वा त्यापुर्वी सदर नौकांना समुद्रात मासेमारीकरीता जाता येणार नाही. राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर (सागरी किनाऱ्यापासुन 12 सागरी मैलापुढे) खोल समुद्रात मासेमारीस जाणाऱ्या नौकांस केंद्र शासनाच्या खोल समुद्रातील मासेमारीबाबतचे धोरण / मार्गदर्शक सूचना / आदेश लागू राहतील.

राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात (सागरी किनाऱ्यापासुन 12 सागरी मैलापर्यंत) यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौका पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना आढळल्यास / केल्यास महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा), 2021 च्या कलम 14 अन्वये नौका व नौकेवर बसविलेली उपसाधने व मासेमारी सामुग्री आणि त्यामध्ये सापडलेली मासळी जप्त करण्यात येईल तसेच कलम 17 मधील तरतुदी अन्वये जास्तीत जास्त कठोर शास्ती लादण्यात येईल. पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत मासेमारी करतांना यंत्रचलित व यांत्रिक मासेमारी नौकेस अपघात झाल्यास अशा नौकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. बंदी कालावधीमध्ये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात मासेमारी नौकास अवागमन निषिध्द आहे. तरी सर्व मच्छिमारी सहकारी संस्था, त्यांचे नौकामालक, सभासद व अन्य संबंधितांनी सदर प्रसिध्दी निवेदनाची नोंद घेवून विहीत बंदी कालावधीत यंत्रचलित व यांत्रिकी नौकांद्वारे समुद्रात मासेमारी केली जाणार नाही. याची दक्षता घ्यावी.अधिक माहितीकरिता कार्यालयाचा पत्ता अलिबाग कोळीवाडा, बंदररोड, कस्टम हाऊस जवळ, अलिबाग दूरध्वनी क्र.02141-295221.

# केडीएमसी अधिकारी - कर्मचाऱ्यांनी काटकसरीने वीज वापरा : विद्युत विभागाचे आवाहन

## वीज बिलावरील कोट्यवधींचा खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** नियुक्ती झाल्यापासूनच केडीएमसीचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी ॲक्शन मोडमध्ये असलेल्या आयुक्त अभिनव गोयल यांनी आपला मोर्चा आता अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या वीज वापराकडे वळवला आहे. दर वर्षागणिक वीज बिलावरील वाढत चाललेला कोट्यवधींचा खर्च पाहता महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अनावश्यक वापर टाळून काटकसरीने वीज वापरण्याचे आवाहन आयुक्त अभिनव गोयल यांनी केले आहे. यासंदर्भात केडीएमसी विद्युत विभागाच्या माध्यमातून एक परिपत्रक काढण्यात आले असून त्याद्वारे हे आवाहन करण्यात आले आहे. आजच्या घडीला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या वीज वापर आणि वीज बिलाच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास या वीज बचतीचे अधिक महत्त्व पटून येईल. आजमितीस कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या विविध विभागांचा वीजवापर पाहता दरवर्षी तब्बल 85 कोटींहून अधिक वीज बिल येत आहे. ज्यामध्ये नागरिकांच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा विभाग असलेल्या पाणी पुरवठा खात्याचा वाटा सर्वाधिक म्हणजे 60 कोटींच्या घरात आहे. त्यानंतर शहरातील पथदिवे 15 कोटी 47 लाख, जलनिसारण - मलनिसारण 6 कोटी 88 लाख, कार्यालयीन 1 कोटी 88 लाख, नाट्यगृह 1 कोटी 67 लाख, रुग्णालये 1 कोटी 65 लाख, घनकचरा व्यवस्थापन 91



लाख अशी त्याची वर्गवारी आहे. महापालिका प्रशासकीय इमारत, महापालिका भवन, महापालिका रुग्णालये, प्रभागक्षेत्र कार्यालये, नाट्यगृह या सर्व महापालिका इमारतीमध्ये महापालिका अधिकारी यांच्यासाठी वातानुकुलीन व्यवस्था, लाईट व्यवस्था तसेच महापालिका कर्मचारी यांचेसाठी लाईट व्यवस्था, फॅन व्यवस्था करण्यात आली आहे. इतक्या मोठ्या संख्येने असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू पाहता त्यांचा वापरही तितक्याच मोठ्या प्रमाणात होत आहे. परिणामी केडीएमसीला कोटींच्या घरामध्ये महावितरण कंपनीला वीजेचे बील अदा करावे लागत आहे. मात्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालयीन वीज वापराच्या पद्धतीमध्ये छोटे छोटे बदल केले तरी विजेसोबतच महापालिकेच्या निधीची मोठी बचत होऊ शकते अशी माहिती कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

'थेंबे थेंबे तळे साचे' या संकल्पनेवर आधारीत कार्यालय आणि सार्वजनिक ठिकाणी वातानुकुलीत यंत्रे, लाईट, फॅन याचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच आवश्यकता नसताना कार्यालयातील, सार्वजनिक ठिकाणी असलेली वातानुकुलीत यंत्रे, लाईट, फॅन हे बंद करण्याची शिस्त स्विकारल्यास वीजेची बचत होऊन वीज बीलावरील खर्चही कमी होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

त्याअनुषंगाने महापालिका अधिकाऱ्यांनी पुढील गोष्टींचा अवलंब करण्यासह आपल्या अखत्यारीतील कर्मचाऱ्यांचेही विज बचतीबाबत प्रबोधन करण्याचे आवाहन या पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

दालन किंवा बैठकीच्या ठिकाणी कॉन्फरन्स रुममधील वातानुकुलीत यंत्र २६ डीग्री सेल्सीयसवर सेट करण्यात यावीत. दालन सोडतांना किंवा दालनात नसतांना वातानुकुलीत यंत्रे, लाईट, फॅन तात्काळ बंद करणेबाबत शिपाई यांना आदेश देण्यात यावेत. आपल्या अधिनस्त कर्मचारी यांनीही त्यांचे आसन सोडतांना त्यासाठी लावण्यात आलेला लाईट, फॅन बंद करणेबाबत स्पष्ट निर्देश देण्यात यावेत.

तर महापालिका रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य वर्धिनी, हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे दवाखाना आदी ठिकाणी कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांनीही आवश्यकतेनुसार वीजेचा वापर करण्याचे स्पष्ट निर्देश वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांनी द्यावेत. नाट्यगृहामधील वातानुकुलन यंत्रणा ही मध्यवर्ती स्वरुपाची असल्याने त्यासाठी वीजेचा मोठा वापर होतो. त्यामुळे नाट्यगृह व्यवस्थापकांनी नाटकाचा प्रयोग सुरू होण्यापूर्वी २० मिनीट आधी वातानुकुलीत यंत्रणा सुरु करावी. तसेच नाट्यगृहातील लाईट, फॅन याचा वापरही आवश्यकतेनुसार करण्याचे नियोजन व्यवस्थापकांनी करावे.

तर १ युनिटची वीजबचत म्हणजे २ युनीटची निर्मिती असल्याने महापालिकेतील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी वीजेचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी केली आहे.

## 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवात
# राष्ट्ररक्षणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** सनातन संस्थेच्या वतीने आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद' महोत्सवात हिंदु धर्मजागृती आणि राष्ट्ररक्षणासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या शुभहस्ते हस्ते ४ जणांना 'हिंदु राष्ट्ररत्न', तर २० जणांना 'सनातन धर्मश्री' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या वेळी कार्यक्रमाला २३ देशांतील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमी उपस्थित होते. या प्रसंगी व्यासपीठावर सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ आणि श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ यांची वंदनीय उपस्थिती होती.



या प्रसंगी सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते चेतन राजहंस म्हणाले, "देशात विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना 'पद्म' 'पद्मभूषण' आणि 'पद्मविभूषण' पुरस्कार दिले जातात; मात्र हिंदु धर्मासाठी जीवन समर्पित करून कार्य करणाऱ्यांना अद्याप कोणताही सन्मान दिला जात नाही. ही पोकळी भरून काढण्यासाठी सनातन संस्थेने हा पुरस्कार आरंभला आहे. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी हे पुरस्कार दिले जातील."

उत्तरप्रदेश येथील आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड, बांगलादेश येथील 'बांगलादेश मायनॉरिटी वॉच'चे संस्थापक पू. अधिवक्ता रवींद्र घोष, कर्नाटक येथील पंचशिल्पकार पू. काशीनाथ कवटेकर, महाराष्ट्रातील मुंबई येथील प्रख्यात प्रवचनकार डॉ. सच्चिदानंद शेवडे, यांना 'हिंदु राष्ट्ररत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तर 'सनातन धर्मश्री' पुरस्कार देऊन सन्मानित करणाऱ्यांमध्ये भाग्यनगर येथील हिंदुत्वनिष्ठ आमदार टी. राजा सिंह, काशी-मथुरा येथील मंदिरमुक्तीसाठी लढा देणारे सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु जैन, गोवा येथील घनपाठी आचार्य योगेश्वर बोरकर, गोवा येथील पंडित महामहोपाध्याय डॉ. देवदत्त पाटीलजी, कर्नाटक येथील श्रीराम सेनेचे संस्थापक प्रमोद मुतालिक, कर्नाटक येथील 'युवा बिग्रेडचे मार्गदर्शकचक्रवर्ती सुलीबेले, दिल्ली येथील चाणक्य फोरमचे संपादक मेजर गौरव आर्यजी, दिल्ली येथील 'सुदर्शन वाहिनी'चे प्रधान संपादक डॉ. सुरेश चव्हाणके, उत्तर प्रदेश येथील 'प्राच्यम्'चे संस्थापक कॅप्टन प्रवीण चतुर्वेदी, तामिळनाडू येथील हिंदू मक्कल कत्छी'चे संस्थापक अर्जुन संपथ, दिल्ली येथील 'सेव कल्चर सेव भारत फाऊंडेशन'चे उदय माहुरकर, कर्नाटक येथील माजी अतिरिक्त महाअधिवक्ता अधिवक्ता अरुण श्यामजी, बेल्जियम येथील लेखक डॉ. कोएनराड एल्स्ट, ओडीसा येथील 'इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲण्ड कल्चरल हेरिटेज'चे अनिलकुमार धीर, दिल्ली येथील अग्नि समाजा'चे संस्थापक संजीव नेवर, दिल्ली येथील 'सरयु ट्रस्ट'चे संस्थापक राहुण दिवाण, हरियाणा येथील विचारवंत नीरज अत्री, मुंबई येथील समाजसेवक तथा लेखक डॉ. अमित थडानी, इंडोनेशिया येथील 'धर्मस्थापनम्' फाऊंडेशनचे रस आचार्य पू. धर्मयशजी महाराज आणि छत्तीसगड येथील प्रबल प्रतापसिंग जुदेव यांचा समावेश आहे.

# क्षत्रिय समाज चॅरिटेबल ट्रस्टची किडनी उपचारासाठी मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** क्षत्रिय समाज चॅरिटेबल ट्रस्टकडून एक संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकी जपत "मिशन अपराजिता सिंह" अंतर्गत अपराजिता सिंह यांच्या किडनी उपचारासाठी एक छोटी एकूण ₹ 65,000 ची आर्थिक मदत त्यांच्या वडिल अंजनी सिंह यांना प्रदान करण्यात आली.

संस्थेचे संस्थापक ॲडव्होकेट विनय कुमार सिंह यांनी सांगितले की क्षत्रिय समाजाच्या विकासासाठी ही संस्था जमीन पातळीवर कार्यरत आहे आणि भविष्यातही निस्वार्थपणे कार्य करत राहील. ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून समाजातील एकजुटीचे आणि संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. या पवित्र कार्याच्या यशामध्ये संस्थेचे मार्गदर्शक प्रभाकर सिंह, अभिराम सिंह, माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुधीर सिंह, श्रवण कुमार सिंह, राजेश सिंह, राजनाथ सिंह, मृत्युंजय शाही यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय ठरली. ठाणे प्रभारी भगवंत सिंह आणि प्रदीप सिंह यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

# गटाराची कामे रखडली नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

## शिवसैनिक म्हात्रे यांची प्रशासनावर नाराजी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** पावसाळ्यापूर्वी रस्त्यातील गटाराच्या दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. मात्र डोंबिवली पश्चिमेकडील सुभाष रोडवरील गटाराची कामे रखडल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु असल्याचे शिवसैनिक नरेंद्र म्हात्रे यांनी सांगितले आहे.

पश्चिमकडील सुभाष रोड परिसरातील गटारांची दुरुस्ती व नविनिकरणाची कामे मागील दोन महिन्यांपासून अर्धवट अवस्थेत आहेत. यामुळे साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात भयंकर दुर्गंधी पसरली असून, या भागातील पंधरा ते वीस गृहनिर्माण सोसायट्यांमधील रहिवाशांना आरोग्य व जीवनमानावर परिणाम करणाऱ्या परिस्थितीचा सामना करावा लागत असल्याचे शिवसैनिक म्हात्रे यांनी सांगितले.

शिवसैनिक म्हात्रे यासंबंधी पालिकेकडे तक्रारी केली आहे. मात्र अद्याप काम पूर्ण न झाल्यामुळे म्हात्रे यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. आता पावसाळ्याला अवघे दहा दिवस उरले असताना, जर कामे वेळेत पूर्ण झाली नाहीत तर सुभाष रोड परिसरातील रस्त्यावर पाणी साचेल. त्यामुळे सोसायट्यांच्या आवारात तसेच नागरिकांच्या घरामध्ये व दुकांनांमध्येही पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. विश्वंभर सोसायटी, कुलकर्णी बंगला, घोलप बिल्डिंग, कागदे हॉल, मातृ प्रेरणा, देवदत्त सोसायटी आणि इतर सोसायटीलाही त्रास आहे. प्रशासनाने यावर त्वरित पावले उचलून कामे पूर्ण करावी व नागरिकांना येणाऱ्या पावसाळ्यात संभाव्य त्रासापासून वाचवावे अशी मागणी नरेंद्र म्हात्रे आणि सोसायटीचा पदाधिकाऱ्यांकडून होत आहे.

## दावडी येथील
# बेकायदा इमारतीवर केडीएमसीचा हातोडा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** डोंबिवली पूर्वीतील दावडी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या नावे असलेल्या जागेवर भूमाफियांनी आठ मजली बेकायदा इमारत उभारण्यात आली होती. या बेकायदा इमारत प्रकरणी केडीएमसीकडे तक्रार प्राप्त झाली होती. मंगळवारी सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी ही बेकायदा इमारत पाडण्याची कारवाई सुरु केली आहे. केडीएमसी बांधकाम नियंत्रण उप आयुक्त अवधूत तावडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया दिली कि, डोंबिवली पूर्वीतील दावडी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वारसांच्या नावे असलेल्या जागेवर अनाधिकृत इमारत बांधकाम करण्यात आल्या बाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने संदर्भीत अनाधिकृत इमारत बांधकाम पाडकाम सुरू करण्यात आले आहे. प्रशासनाच्या अनाधिकृत इमारत बांधकामावर तोडक कारवाई बडग्यामुळे भुमाफियाचे धाबे दणाणले असल्याचे दिसून येत आहे.

## अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी
# 'श्री महाधन्वन्तरि याग' भावपूर्ण वातावरणात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

'सांप्रत काळ समस्त जगासाठी अतिशय वाईट काळ म्हणजेच आपत्काळ आहे. युद्धाचे सावट डोक्यावर येऊन ठेपले आहे. या घनघोर आपत्काळात शत्रू केवळ शस्त्रास्त्रांनीच नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे रोगजंतूंच्या माध्यमातूनही आपल्यावर आक्रमण करू शकतो. या न पाहिलेल्या नवीन आपत्तींना तोंड देण्यासाठी सर्वांचे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक बळ चांगले असणे आवश्यक आहे. 'सर्वांचे कल्याण व्हावे', या उद्देशाने या 'श्री महाधन्वन्तरि यागा'चे प्रयोजन आहे. 'लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ।' म्हणजे 'सर्व लोक सुखी होवोत', या उद्देशाने सनातन संस्था आयोजित ऐतिहासिक आरि भव्य अशा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या ठिकाणी 'श्री महाधन्वन्तरि याग' करण्यात



आला. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमींची उपस्थिती होती.

या महायागासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्यासह त्यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीसत्शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ, श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, गोव्याचे आरोग्यमंत्री श्री. विश्वजित राणे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आमदार सौ. दिव्या विश्वजित राणे यांच्या अनेक संत-महंत, प्रतिष्ठित यांची विशेष उपस्थिती होती. पुरोहितांनी म्हटलेल्या मंत्रघोषामुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय आणि चैतन्यमय झाले होते. या संदर्भात सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक म्हणाले, "शिवागम विद्यानिधी आगमाचार्य श्री. अरुणकुमार गुरुमूर्ती आणि गुरुमूर्ती शिवाचार्य यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली या यागात ६१ दांपत्य यजमान म्हणून सहभागी झाली होती. जेव्हा भगवंताचे हजारो भक्त आणि वेदब्राह्मण एकत्रित येऊन यज्ञ करतात, तेव्हा तो यज्ञ 'महायज्ञ' बनतो. त्यामुळे या महोत्सवात हजारो भक्त, भाविक एकत्रित येऊन झालेला हा 'धन्वन्तरि याग' 'श्री महाधन्वन्तरि याग' बनला आहे. या यज्ञाचा संकल्प केवळ व्यष्टी किंवा कौटुंबिक या स्तरांवर मर्यादित नसून तो विश्वव्यापक संकल्प आहे." या कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी व थेट प्रक्षेपणासाठी भेट द्या - SanatanRashtraShankhnad.in

# 'जिओ पारसी' योजनेंतर्गत जिल्हास्तरीय समिती स्थापन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेल्या काही दशकांपासून पारशी लोकसंख्येत लक्षणीय घट होत आहे. पारशी समाजाच्या सतत घटणाऱ्या लोकसंख्येवर उपाययोजना म्हणून "जिओ पारसी योजना" राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. ही योजना केवळ आर्थिक सहाय्यपुरती मर्यादित नसून, ती वैचारिक, सामाजिक व वैद्यकीय मार्गदर्शनाचीही आहे. यामार्फत पारशी समाजाच्या अस्तित्वाचे संवर्धन आणि टिकाव सुनिश्चित करण्याचा शासनाचा उद्देश आहे.

धार्मिक अल्पसंख्यांक पारसी समुदायाच्या कल्याणासाठी "जिओ पारसी" ही केंद्रीय क्षेत्रातील योजना राबविण्यात येत आहे. "जिओ पारसी" या केंद्र शासनाच्या विशेष उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर समन्वय, मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात येत आहे:

**जिल्हास्तरीय समितीचे सदस्यः**

अध्यक्ष - जिल्हाधिकारी, ठाणे

निमंत्रित सदस्य - जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. ठाणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, ठाणे, जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे, संबंधित क्षेत्रातील मान्यवर पारसी समाज प्रतिनिधी

सदस्य सचिव - जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, ठाणे

**समितीची कार्यकक्षाः**

1. "जिओ पारसी" योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे.
2. ही समिती "जिओ पारसी" उपक्रमाच्या यशासाठी पारसी समाज व केंद्र शासन यांच्यामध्ये एक महत्त्वाचा दुवा असेल. या योजनेच्या लाभांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी सल्लामसलत सत्रे व कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल.
3. ही समिती लाभार्थ्यांकडून प्रस्ताव प्राप्त करेल, डॉक्टर किंवा क्लिनिकच्या मदतीने त्यांचे मूल्यांकन करेल व उपचारासाठी पात्र लाभार्थ्यांची शिफारस करेल, तसेच भरपाईसाठी आलेल्या खर्चाच्या बिलांची तपासणीही करेल.
4. जिल्हास्तरीय समिती 'HOC' (Health of Community) घटकांतर्गत प्राप्त अर्जाचा विचार करण्यासाठी व शिफारस करण्यासाठी दर तीन महिन्यांनी बैठक घेईल.

**5. जिल्हा समितीला खालील अधिकार असतील:**

i) सर्व अर्जांची छाननी करणे.
ii) पडताळणी झालेल्या व निवडलेल्या HOC अर्जदारांची शिफारस मंत्रालयातील मंजूरी समितीकडे पाठविणे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024